बुधवार, दि २५ जून २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४१ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# पत्रकारांनो ‘आस्था’ ठेवू नका!

## पत्रकारांपासून दूर राहतो, पहिले सांगितले असते तर रुग्णालयात दाखल केले नसते; व्वा.. रे... डॉक्टर

### आस्था हॉस्पीटलची पत्रकारांबद्दल हिन भावनेचा प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने निषेध

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नामांकित असलेल्या आस्था हॉस्पीटल हे पत्रकारांच्या रुग्णांपासून दूर राहते, जर पत्रकार म्हणून या हॉस्पीटलमध्ये गेल्यास रुग्णास दाखलच (ॲडमिट) करून घेत नसल्याचे दस्तुरखुद्द आस्थाचे डॉ पाटील यांनीच म्हटले आहे. विशेष म्हणजे केवळ एकाच पत्रकाराबद्दल नव्हे तर सर्वच पत्रकारांबद्दलची त्यांची भूमिका तशीच असल्याचे ते बोलतांना एका व्हिडीओत स्पष्ट दिसत आहे. रुग्णांसाठी डॉक्टर म्हणजे एक प्रकारे देवच. आणि हॉस्पीटल म्हणजे देवालय. असे म्हणतात रुग्ण सर्वसामान्य, गरीब असो अथवा पत्रकारांचा नातेवाईक डॉक्टरांवर रुग्ण बरा व्हावा म्हणून एकप्रकारे सर्वांचीच आस्था असते, मात्र, पत्रकारांनी आता हॉस्पीटलवर ‘आस्था’ ठेवू नये असेच म्हणण्याची वेळ आली आहे.



असे असले तरी काही हॉस्पीटलमध्ये रुग्णांकडून अव्वाच्या सव्वा बिले लावून वसुलीचा जणू काही धंदाच सुरु असल्याचे अनेक तक्रारीवरुन स्पष्ट होत आहे. सदैव रुग्णांच्या सेवेत असलेल्या डॉक्टरांनी पत्रकारांबद्दल असे वक्तव्य करणे कितपत योग्य आहे? योजनेत उपचार सुरु असतांना केवळ पन्नास हजार रुपये योजनेत मिळणार असल्याचे सांगून इतर खर्च रुग्णांच्या नातेवाईकांना द्यावा लागेल या शर्थीवर रुग्णांचे उपचार आस्था हॉस्पीटलमध्ये केल्या जात आहे. केवळ डॉक्टरांचाच खर्च नव्हे तर मेडीकलचा खर्चही वसुल करण्याची तयारी हॉस्पीटल प्रशासन करते आहे. शासन जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य गरीब जनतेचे उपचार मोफत व्हावे यासाठी प्रयत्नशील आहे. जवळपास ९०० वर आजारावरील खर्च योजनेच्यामाध्यमातून शासन हॉस्पीटल प्रशासनाला देते. त्यावर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हावार डीएम नियुक्त करण्यात आलेले आहे. हॉस्पीटल प्रशासनाकडून अनेक वेळा योजनेत असल्यानंतरही पैशाची मागणी होते यासंदर्भातील अनेक तक्रारी आहेत. जालना येथील डीएम डॉ. सानप यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रारीचे निराकरण ते करतात. डॉ. सानप यांच्यामुळे अनेक रुग्णांच्या नातेवाईकांना हॉस्पीटल प्रशासनाने अधिकचे घेतलेले पैसे परत केलेले आहेत. त्याचे काम चांगले आहे. असे असले तरी केवळ पैसे परत केल्यानंतर समस्या पूर्णपणे दूर होत नाही. हॉस्पीटल प्रशासन पुन्हा तेच पाढे गिरवितात. त्यामुळे अशा हॉस्पीटलवर कारवाई होणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉ. सानप यांनी प्रयत्न करावेत.

एका रुग्णांचा जीव गेल्यानंतर त्या रुग्णाच्या नातेवाईकाकडून जवळपास ६७ हजार रुपये जमा केल्यानंतरच मृतदेह ताब्यात देणार असा पावित्रा आस्था हॉस्पीटलने घेतला होता. रुग्णाचा नातेवाईक पत्रकार असल्याने संबंधीत पत्रकाराने जिल्हा शल्य चिकित्सक, जन आरोग्य योजनेचे डीएम यांच्याशी फोन वर चर्चा करून हॉस्पीटलमधील आपबीती सांगितली. यावर हॉस्पीटल प्रशासनाला विचारणा झाली. त्यानंतर हॉस्पीटल प्रशासनातील डॉ. पाटील यांनी मृतदेह रुग्णांच्या नातेवाईकाच्या ताब्यात दिला. तत्पुर्वी त्यांनी त्या पत्रकाराशी संवाद साधला आणि त्यात त्यांनी स्पष्ट केले की, माझा यात लॉस आहे, योजनाचे पैसे तीन महिन्यांनंतर मिळतात. मी आपल्याला मदत करण्याच्या दृष्टिने उपचार केले. पत्रकार आहे हे आधी माहिती असते तर रुग्णाला ॲडमीट करून घेतले नसते, पत्रकार हे असेच असतात. पत्रकार लोकं ऐनवेळी अचानक त्यांचा मुड चेंज होतो. पत्रकारांना मी घेत नाही. पत्रकारांसाठी मी दोन-तीन कॅम्प घेतले मात्र, त्याचे अनेक प्रॉब्लेम असतात म्हणून त्यांच्यापासून थोडेसे दूर राहतो. आस्था हॉस्पीटलच्या डॉ. पाटील यांच्या या भूमिकेमुळे सर्वच पत्रकारांची बदनामी होत असल्याने आस्था हॉस्पीटलवर त्वरीत कारवाई करावी अशी मागणी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी केली आहे. श्री शेळके यांनी आस्था हॉस्पीटलच्या पत्रकारांबद्दलच्या हिन भावनेचा निषेधही व्यक्त केला.

### २६ जून रोजी मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्यासह जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार

आस्था हॉस्पीटलच्या पत्रकारांबद्दलच्या हीन भावनेचा प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने निषेध व्यक्त करण्यात येत असून शुक्रवार (दि २६) रोजी हॉस्पीटल प्रशासन व डॉ. पाटील यांच्यावर कारवाईसाठी मुख्यमंत्र्यांसह जिल्हाधिकारी जालना यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी म्हटले आहे. सदरील व्हिडीओ प्राप्त करण्यासाठी ८३९००९८८८६ या क्रमांकावर ‘हॉस्पीटलचा व्हिडीओ सेंड करा’ असा मॅसेज केल्यास ‘हा’ व्हिडीओ पाठविण्यात येईल.

## २६ जुनला पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

### मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जालना अणिकला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाथ्रीकर कॅम्पस बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार दि. २६ जून, २०२५ रोजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पाथ्रीकर कॅम्पस, जालना - छत्रपती संभाजी नगर रोड ता.बदनापूर जि.जालना येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंतपंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे १ हजार ८७ पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध आहेत. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते मेळाव्याचे उदघाटन होणार आहे. रोजगार मेळावा हा मेळाव्याचे अध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होणार आहे.

मेळाव्यात दहावी, बारावी, आय.टी.आय.ऑल ट्रेड, बी.ए.,बी.कॉम, बी.एससी., एम.कॉम,बी. ई., बी. टेक डिप्लोमाधारक इत्यादी पात्रता धारक नोकरी इच्छूक उमदवारासाठी एकूण १ हजार ८७ रिक्त पदे उपलब्ध असून मुलाखतीसाठी विविध १४ कंपन्यांचे पान ३ वर

## ‘त्या’ प्रकरणात पत्रकारांची निर्दोष मुक्तता

### सहा मुद्द्यांवर मा. न्यायालयाचे नकारात्मक शेरे; फिर्यादीच्या कामकाजावर ओढले ताशेरे

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जालना येथील प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी डॉ. योगिनी अविनाश बाळंके यांनी जुलै २०२० मध्ये चंदनझिरा पोलिसात दाखल केलेल्या गुन्हयातील पत्रकारांची अतिरिक्त सत्र न्यायाधिश किशोर जैस्वाल यांनी नुकतीच निर्दोष मुक्तता केली. निकालपत्रात श्रीमती योगिनी बाळंके यांच्या कार्यपध्दतीसह एकंदरीतच तक्रार आणि गुन्हा दाखल होण्यास झालेला विलंब याविषयी शंका उपस्थित करण्यात आल्याने तक्रारी विषयीच संभ्रमावस्था आहे अशी माहिती ॲड. लक्ष्मण उढाण, ॲड. महेश धन्नावत आणि ॲड. योगेश खरात यांनी दिली.

या गाजलेल्या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जालना येथील प्राभारी उप प्रादेशिक अधिकारी श्रीमती योगिनी बाळंके यांनी ता.३१ जुलै २०२० रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्यात जालन्यातील तीन पत्रकार अनुक्रमे अर्पण गोयल, भरत मानकर, विष्णू कदम आणि निळकंठ कुलकर्णी अशा चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला. त्यांच्या तक्रारीनुसार सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, सार्वजनिक शांततेचा भंग करणे, बदनामी करणे शिवाय हे सर्व पान ३ वर



# संपादकीय

## आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५० वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## भानुदास दोबाले यांना 'योगरत्न पुरस्कार २०२५' प्रदान!

**जालना । प्रतिनिधी -** योग, अध्यात्म आणि सामाजिक क्षेत्रातील १३ वर्षांच्या अथक कार्याची दखल घेत जालण्यातील सामाजिक कार्यकर्ते भानुदास




दोबाले यांना 'योगरत्न पुरस्कार २०२५' देऊन गौरवण्यात आले. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व डॉक्टर सेल - आयुष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पैठण गेट, छत्रपती संभाजीनगर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. भानुदास दोबाले हे गेल्या १३ वर्षांपासून शिक्षण, योग, अध्यात्म आणि सामाजिक कार्यात सक्रियपणे योगदान देत आहेत. समाजात योगाचा प्रसार, अध्यात्मिक जागृती आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांच्या या निस्वार्थ सेवेची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# तळागाळातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे पुस्तक; माझ्या जीवनातील तेजस्वी तारे

जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी या शाळेत कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक व सुप्रसिद्ध गणित शिक्षक म्हणून कार्यरत असलेले माझे गुरुवर्य बबनराव गुळवे गुरुजी हे आपला शिक्षकी पेशा सांभाळत विविध वर्तमानपत्रात लेखन करतात. आजवर त्यांचे हजारो लेख विविध वर्तमानपत्रात प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या दर्जेदार लेखांचे नियमित वाचन करणारे वाचक मित्र पण महाराष्ट्रात खूप आहेत. सरांचे लेखन मार्मिक व दर्जेदार असते. त्यामुळे सरांचे लेख वाचकांना खूप आवडतात. बरेच वाचक मित्र सरांना फोन करून लेख आवडल्याचे सांगतात. फोन करून सरांचे मनःपूर्वक अभिनंदन करतात आणि लिहिण्यासाठी त्यांना आणखीन प्रेरणा देतात.

पण सरांचे काही नियमित वाचक मित्र सरांना तुमचे एखादे पुस्तक वाचनासाठी उपलब्ध आहे का? म्हणून आपुलकीने विचारायचे. तेव्हा सरांची बोलती बंद व्हायची. आणि सर म्हणायचे मला दिवसभर शाळा करावी लागते आणि शाळेतून घरी गेल्यावर परिवारासोबत वेळ द्यावा लागतो. म्हणून मला पुस्तक लिहिण्यासाठी तेवढा वेळ मिळत नाही. पण तरी सुद्धा मी वेळात वेळ काढून वर्तमानपत्रात निरंतर लेखन करीत असतो. माझी पण एखादे पुस्तक लिहिण्याची खूप इच्छा आहे. पण वेळ मिळत नसल्यामुळे मला लिहिणे होत नाही. पण जेव्हा मला भरपूर वेळ मिळेल, तेव्हा मी नक्कीच एखादे तरी पुस्तक लिहून प्रकाशित करेल.असे वाचक मित्रांना सर बजावून सांगायचे. पण योगायोग असा झाला की, अचानक देशावर कोरोना महामारीचे संकट आले आणि सगळा देश ठप्प झाला. देशात सगळीकडे लॉकडाऊन सुरू झाले. शाळा, कॉलेज बंद झाले. त्यामुळे सरांना खूप दिवस सुट्टीवर राहता आले. म्हणून सरांना पुस्तक लिहिण्यासाठी खूप दिवस वेळ मिळाला. तेव्हा सरांनी मिळालेला पूर्ण वेळ इतरत्र वाया न घालवता पुस्तक लेखनात घालवला. पुस्तक लिहिण्यापूर्वी सरांच्या मनात एक प्रश्न तरळला की, आपण कोणत्या विषयावर पुस्तक लिहायचे? विषय निवडीसाठी सरांच्या मनात विचारचक्र सुरू झाले. आणि सरांना माहीत झाले की, आपल्याला तर सुरुवातीपासूनच छान व्यक्तिरेखा लिहिता येतात, म्हणून सरांनी जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर भेटलेल्या अनेक व्यक्तींचे बारकाईने निरीक्षण केलेल्या व्यक्तिरेखा लिहिण्याचे ठरवले. त्यासाठी सरांनी विषय निवडला, माझ्या जीवनातील तेजस्वी तारे, आणि या विषयाचे पुस्तक लिहिण्याचे सरांनी ठरवले. सरांनी लॉकडाऊनमध्ये अहोरात्र लिखाण करून काही दिवसातच पुस्तक लेखन पूर्ण केले. आणि पुस्तक लेखन पूर्ण झाल्यावर सरांनी लागलीच पुस्तकाचे प्रकाशन सुद्धा केले. आणि ते पुस्तक वाचक मित्रांसाठी उपलब्ध करून दिले. माझ्यासह अनेक वाचक मित्र हे पुस्तक वाचून प्रभावित झाले.मी सुद्धा सरांच्या लेखांचा नियमित वाचक आहे. त्यांच्या विचारांचा सच्चा पाईक आहे.मला पण सरांचे लेख खूप आवडतात. मी आतापर्यंत सरांचे खूप लेख वाचले आहेत. सरांचे अनेक लेख वाचून मी प्रभावित झालो आहे. आणि वर्तमानपत्रात लिहू लागलो आहे. सरांच्या विचारांवर विचार करून लेख लिहिणे माझा आवडता छंद आहे. माझ्यासह अनेक वाचक मित्रांनी सरांना पुस्तक लिहिण्यासाठी तगादा लावला होता. कारण मला सुद्धा सरांचे पुस्तक वाचण्याची खूप इच्छा होत होती. कारण सरांचे विचार इतके महान आहेत की, एखादा लेख वाचल्याने वाचकांचे मन कधीच भरत नव्हते. म्हणून बऱ्याच वाचकांना सरांच्या पुस्तकरुपी महासागराचे वाचन करण्याची प्रचंड इच्छा निर्माण झाली होती.सरांचे लिखाण खरंच खूप दर्जेदार व प्रभावी असते. जेव्हा सरांनी पुस्तक लिहिले म्हणून मला कळाले, तेव्हा लगेच मी सरांना फोन केला आणि ते पुस्तक वाचण्यासाठी मागितले. आणि लगेच दुसऱ्या दिवशी सरांनी ते पुस्तक मला शाळेत आणून पण दिले. घरी आल्यावर निवांत वेळी मी ते पुस्तक वाचू लागलो. सरांनी लिहिलेल्या प्रत्येक ओळीवर विचार करू लागलो. सरांनी ते पुस्तक कोणालाही समजेल अशा साध्या व सरळ भाषेत लिहिले आहे. प्रत्येक वाचकाला आवडेल व मनाला भावेल अशा सुंदर व सोप्या शब्दांत ते पुस्तक लिहिले आहे. अतिशय सुंदर व आकर्षक शैलीत सरांनी त्या पुस्तकाची मांडणी केली आहे.त्या पुस्तकात सरांनी आपला सगळा जीव ओतून व अतिशय मन लावून ते पुस्तक लिहिले आहे. प्रत्येक वाचकाच्या काळजाला हात घालणारे ते पुस्तक आहे. सरांनी त्या पुस्तकात आपला संपूर्ण शालेय व महाविद्यालयीन जीवन प्रवास व त्या जीवन प्रवासात भेटलेल्या चांगल्या व्यक्ती, आणि त्या व्यक्तींना भेटून त्यांचे वेगवेगळे आलेले अनुभव, त्यांचा स्वभाव, त्यांचे राहणीमान आणि त्यांचे वर्तन याचे यथोचित वर्णन करून सरांनी हे पुस्तक लिहिले आहे. सरांना बालवयात त्यांच्या मनावर त्यांच्या आईने व आजीने केलेले संस्कार सरांच्या बालमनावर कसे रुजत गेले? आणि आईवडिलांचा जीवन संघर्ष त्यांना कसा प्रेरणा देत गेला? सरांच्या शिक्षणासाठी आई-वडिलांनी किती संघर्ष केला व किती कष्टाची कामे केली? हे सरांनी त्या पुस्तकात अतिशय सुंदर पद्धतीने लिहिले आहे. सरांना शिक्षण घेत असताना किती आर्थिक अडचणीचा सामना करावा लागला होता आणि शून्यातून विश्व निर्माण करण्यासाठी त्यांना आई-वडिलांची व बहिण भावाची कशी मदत मिळत गेली, हे त्यांनी त्या पुस्तकात परखडपणे मांडले आहे. महार व शूद्र जातीचा असल्यामुळे बालवयात सरांना जातीयतेचे किती विखारी चटके सहन करावे लागले, आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणाचा पर्वत कसा लीलया सर केला? हे आपल्याला तेजस्वी तारे हे पुस्तक वाचल्यावर कळते. त्यांच्या शिक्षकी पेशाच्या जीवन प्रवासात त्यांना भेटलेल्या प्रत्येक सहकारी शिक्षकाचे यथोचित वर्णन सरांनी अतिशय मनमोहक शब्दात रेखाटले आहे. त्यांना या कालावधीत भेटलेले विविध नमुन्याचे शिक्षक जसे की, व्यसनी, कामचुकार, बढाईखोर, राजकारणी आणि टंगळमंगळ करणाऱ्या शिक्षकांचा त्यांनी




या पुस्तकात जाहीर धिक्कार केला आहे. आणि प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, जीव ओतून शिकवणाऱ्या आदर्श व कर्तृत्ववान शिक्षकांचा या पुस्तकात त्यांनी सन्मान केला आहे. त्यांच्या जीवनातील तेजस्वी तारे हे खरोखरच समाजासाठी आदर्श व प्रेरणादायी आहेत.अगदी सुर्याप्रमाणे तेजस्वी आहेत. तळागाळातील विद्यार्थ्यांना प्रेरणा व दिशा देणारे हे पुस्तक आहे. शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्याने हे पुस्तक आवर्जून वाचावे असे आहे. कारण आपल्याला अभ्यास करण्यास प्रेरित करणारे हे पुस्तक आहे. या पुस्तकात सरांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे. मेलेल्या माणसाला जागे करणारे हे पुस्तक इतरांसाठी आदर्श व मार्गदर्शक आहे. सरांनी हे पुस्तक अतिशय मार्मिक शब्दांत व ओघवत्या वर्णन शैलीत लिहिलेले आहे. मी हे पुस्तक अनेक वेळा वाचले आहे. कितीदाही वाचले तरी मन काही भरत नाही. तरी पण ते पुन्हा पुन्हा वाचावेच वाटते. हे पुस्तक एकदा हाती घेतल्यावर पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवूच वाटत नाही. इतके प्रभावी व दर्जेदार हे पुस्तक आहे. हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांनीच वाचावे असे नाही, तर प्रत्येक शिक्षकांनी देखील हे पुस्तक वाचणे नितांत गरजेचे आहे असे मला वाटते. कारण हे पुस्तक ग्रामीण भागाशी व शिक्षण क्षेत्राशी संबंधित आहे. म्हणून प्रत्येकाने हे पुस्तक वाचावे आणि आपल्या जीवनात यथोचित बदल करावा असे मला वाटते. कारण एकदा का आपण गुळवे सरांच्या विचारांच्या महासागरात पदार्पण केले की, आपल्याला त्या महासागरातून बाहेर येऊच वाटत नाही. एवढे मी खात्रीने सांगू शकतो...म्हणून गुळवे सरांचे तेजस्वी तारे हे पुस्तक विचारांचे वादळ वारे आहे... ते तळागाळातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना प्रेरणा व दिशा देणारे पुस्तक आहे.ते प्रत्येकाने वाचलेच पाहिजे.

**पुस्तक परीक्षण**
**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

**पुस्तक- माझ्या जीवनातील तेजस्वी तारे**
**लेखक- बबन गुळवे**
**प्रकाशक- लोकविद्या प्रकाशन परभणी**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

युवा आदर्श जालना बुधवार, दि २५ जून २०२५ E-mail- yuva.aadarsh@gmail.com



पायाभूत शिक्षणाला आधुनिकतेची जोड; रोटरी क्लब मिडटाऊनचा अभिनव उपक्रम

# जेईएफच्या ऑडिओ-व्हिज्युअल क्लासरूमसाठी एलईडी स्क्रीन भेट

**जालना । प्रतिनिधी -** इयत्ता तिसरी ते सहावीच्या अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या पायाभूत शिक्षणाच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, जालना एज्युकेशन फाऊंडेशनने ऑडिओ-व्हिज्युअल क्लासरूम स्थापन केली असून, या आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्जित क्लासरूमसाठी रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनने ५५ इंची एलईडी स्क्रीन भेट देऊन या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याचे लोकार्पण फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर जालना एज्युकेशन फाऊंडेशनचे विश्वस्त प्रा. ओमप्रकाश झांजरी, क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी, सचिव गौरव मोदी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा. सुरेश लाहोटी म्हणाले की, आम्ही गेल्या बारा वर्षापासून पायाभूत शिक्षणावर काम करत असून, दरवर्षी महत्त्वपूर्ण बदल केले जात आहेत. ऑडिओ-व्हिज्युअल क्लासरूम हा त्याचाच एक भाग असून, रोटरी मिडटाऊनचे योगदान निश्चितच पारंपरिक शिक्षणपद्धतीच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना दृक-श्राव्य माध्यमांद्वारे समजून घेण्याचा अधिक प्रभावी मार्ग उपलब्ध करून देण्याचा एक प्रगत प्रयत्न आहे. क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी म्हणाले की, क्लबतर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत असून, संगणक साक्षरता या क्षेत्रात प्रकल्प राबविण्याचा म नोदय होता. पायाभूत शिक्षणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये प्रगतीसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या नवोपक्रमात योगदान म्हणून आम्ही स्क्रीन टीव्ही



भेट दिली आहे. ज्यामुळे क्लासरूमच्या माध्यम ातून शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची संधी मिळणार असून, त्यांचे बौद्धिक क्षितिज निश्चितच विस्तारेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनचे डॉ. प्रतीक लाहोटी, राहुल भक्कड, मोनाली भक्कड, अक्षत झुनझुनवाला, बनप्रीत झुनझुनवाला, निलेश खंडेलवाल, दीपक गेही, सौरभ झांजरी, रणवीर मिश्रा, प्रतीक नानावटी, सुजाता नानावटी, धवल मिश्रीकोटकर, सोनिया मिश्रीकोटकर, पुनम दक्षिणी, जालना एज्युकेशन फाऊंडेशनचे दिलीप केंद्रे, हेमलता पेम्बार्ती, भाग्यश्री गोमतीवाले, लक्ष्मी यादव, तेजस अग्रवाल आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुक्मिणीकांत दीक्षित यांनी तर शेवटी उपस्थितांचे आभार गौरव मोदी यांनी मानले.

राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने आंदोलन

# शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी जालन्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीनं धरणे आंदोलन करण्यात आले. महायुती सरकार सत्तेत आल्यावर पहिल्या कॅबिनेटमध्ये शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे आश्वासन महायुती सरकारने निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना दिले होते. त्यानंतर महायुती सरकार सत्तेत आले. राज्य सरकारच्या अनेक कॅबिनेट बैठका झाल्या मात्र शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन सरकारने पाळले नाही. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून सातबारा कोरा करावा अशी मागणी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने करण्यात आली असून त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की केंद्र सरकारने जाहिर केलेल्या अहवालानुसार शेतक-यांपेक्षा शेतमजुरांचे उत्तपन्न जास्त आहे. शेती करणे नुकसानीचे बनले आहे. महाराष्ट्रा मध्ये दिवसाला ८ शेतक-यांची आत्महत्या होत आहे. अशा काळात राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडवणीस यांनी निवडणुकी पूर्वी जारीर केले होते की, आमचे सरकार आल्यास शेतक-यांचा सातबारा कोरा करणार आज हे धाडस दाखविण्याची वेळ आली आहे. मुख्यमंत्र्यांनी समिती स्थापन करत वेळकाढूपणा करु नये. शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी द्यावी अशी म ागणी रासपच्यावतीने करण्यात आली. यावेळी रासप पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# अन्यायकारक वक्फ दुरूस्ती विधेयक विरोधात शनिवार रोजी आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र सरकारने मुस्लीमाविरूध्द वक्फ दुरूस्ती विधेयक मंजुर करून मुस्लीमांविरूध्द मोठा अन्याय केलेला आहे. या निर्णयाविरूध्द ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड आणि देशातील अन्य मान्यवर यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. हे अन्यायकारक विधेयक केंद्र शासनाने ताबडतोब मागे घ्यावे या मागणीसाठी मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने शनिवार दि. २८ जून २०२५ रोजी इदगाह मैदान जुना जालना येथे आंदोलन करण्यात येऊन जाहिर निषेध सभा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी जालना जिल्ह्यातील जनतेने हजारोंच्या संख्येने सामिल व्हावे असे आवाहन जालना शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद यांनी केले आहे.

या जाहिर निषेध सभेमध्ये ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ चे प्रमुख पदाधिकारी मौलाना फरजुल रहिम मुझबी, मौलाना उमरेन महसुज रहेमानी, मौलाना सय्यद सदतुल्ला हुसेनी आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवार रोजी आयोजित जाहिर निषेध सभा सायंकाळी ६ ते रात्री १० वाजता शांततेत संपन्न होणार आहे.

केंद्र शासनाने या अगोदर देखिल शेतकऱ्यांविरूध्द अन्याय कारक विधेयक आणले होते. परंतू जनतेच्या रेटयामुळे शासनाला नतमस्तक व्हावे लागले. वक्फ बिल दुरूस्ती विधेयका विरोधात संपुर्ण देशामध्ये आंदोलने होत आहेत. शनिवार रोजी आयोजित आंदोलनामध्ये जालना जिल्हयातील जनतेने हजारोंच्या संख्येने सामिल होऊन शासनाला हे विधेयक मागे घेण्यासाठी भाग पाडावे असे आवाहन जालना शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद यांनी केले आहे. जालना जिल्हा मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड चे संयोजक मौलाना अब्दुल रऊफ आणि सर्व पदाधिकारी हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्नशील असून आंदोलन शांततेत पार पाडण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.




पान १ वरुन

## २६ जुनला ...

प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये एल.जी. बालकृष्णन ॲण्ड ब्रॉस प्रा.लि.जालना ४५ पदे, विक्रम टी प्रोसेसर प्रा.लि. जालना यांची १७ पदे, एन. आर.बी. बेअरींग प्रा.लि. यांची ७० पदे, भुमि कॅटेक्स इंडस्ट्री प्र.लि. जालना यांची १६ पदे, देव अश्व होंडा शोरूम जालना यांची २९ पदे, सलाम किसान ॲण्ड प्राईम अक्रोस्पेस प्रा.लि. जालना यांची २० पदे, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन छत्रपती संभाजीनगर यांनी ६० पदे, युवा शक्ती स्किल इंडिया प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांची १०० पदे, डिस्टील एज्युकेशन ॲण्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांची ५० पदे, डायनामिक ट्रान्समिशन प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांची ५० पदे, फुलंब्री टेक्स. कॉम. प्रा.लि. जालना यांची १५० पदे, बीव्हीजी इंडिया प्रा. लि.पुणे यांची २३० पदे, श्रीकृपा सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे यांची १५० पदे, वैभव इंटरप्राईजेस प्रा. लि. यांची १०० पदे, असून या मेळाव्यासाठी वरील १४ नामांकित कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असुन पात्र उमेदवारांच्या चाचणी व मुलाखती घेऊन विविध पदांच्या रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत.

स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय-या विविध महामंडळाचे स्टॉल लावून स्वंयरोजगाराच्या योजनेची माहिती व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सोबतच महामंडळमार्फत मंजूर केलेल्या प्रकरणातील टॅक्ट्रचे वितरण करण्यात येणार आहे सर्व बँकांनी मंजूर केलेल्या कर्जमंजुरीप्रमाणे पत्राचे वितरण सुध्दा करण्यात येणार आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## त्या प्रकरणात ...

काही संगनमताने केले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. 'चंदनझिरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून श्री. गोयल आणि श्री. मानकर यांना अटक केली, तर श्री. कदम यांचा अटकपुर्व जाम ीन मंजूर झाला. दरम्यानच्या काळात तपास पुर्ण होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सुनावणी दरम्यान तक्रारदार श्रीमती योगिनी बाळंके याच्यासह साक्षीदार अनिल एखंडे, कल्याणी झाडपिडे, आणि रावसाहेब सिरसाठ यांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. त्या बरोबरच साक्षीदारांचे जवाब, प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि मजकुरासह दोषारोपत्र दाखल झाल्याने सर्वच आरोपिंनी आरोप फेटाळल्याने सविस्तर सुनावणी घेण्यात आली.

सुनावणी दरम्यान सरकार पक्षातर्फे उपस्थित करण्यात आलेले मुद्दे आणि फिर्यादी श्रीमती योगिनी बाळंके यांनी तक्रारीतून केलेले आरोप अशा सहाही मुद्यावर न्यायालयाने नकारात्मक शेरे मारत फिर्यादीच्या कामकाजावरही ताशेरे ओढले. फिर्यादीच्या कार्यालयापासून पोलीस ठाणे अवघ्या एक दोन किलोमीटर अंतरावर असतांना तक्रार दाखल करण्यास तीन-चार दिवसांचा विलंब का झाला असा गंभीर प्रश्नही उपस्थित करण्यात आला. त्याबरोबरच तक्रारकर्त्या श्रीमती योगिनी बाळंके या उच्च शिक्षित असून त्यांनी या प्रकरणी बातम्या प्रसिध्द झाल्याने त्याच्या नाराजीतून विचाराअंती म्हणजे प्रकरण अंगलट येऊ नये म्हणून जाणीवपूर्वक गुन्हा दाखल केला असल्याची शक्यताही न्यायालयाने व्यक्त केली. विशेष म्हणजे आरोपी पत्रकारांनी त्यांच्या कार्यालयात घुसुन गोंधळ घातला तसेच नोंदवहीत नोंद केली नाही सरकारी कामात अडथळा निर्माण केला या आणि अन्य आरोपांच्या पृष्ठयार्थ सबळ पुरावे देण्यास फिर्यादी कमी पडल्याचे न्यायालयाचे स्पष्ट केले.

विशेष म्हणजे जालना शहरातील प्रदुषण नियंत्रण करणे हे फिर्यादीचे आद्य कर्तव्य असतांना त्यांनी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केलेच शिवाय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण करणाऱ्या कारखान्यांच्या आस्थापना विरोधात किंवा कारखाना मालकांच्या विरोधात ठोस कारवाई करण्या ऐवजी तो प्रश्न प्रभावी पणे मांडणाऱ्या या पत्रकारांच्या विरोधात तक्रारी गुन्हे दाखल केल्याचे निकालात नमूद करण्यात आले.

जालना प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्र. उपप्रादेशिक अधिकारी श्रीमती योगिनी बाळंके यांनी मा. न्यायालयात कुठलेही ठोस पुरावे सादर करू न शकल्यामुळे मा. न्यायालयाने या प्रकरणातील पत्रकारांची निर्दोष मुक्तता केली आहे.

# जालन्यात प्रथमच एका तपस्वी शिक्षकाचा सेवापूर्ती गौरव सोहळा

## आमदार सुधाकर अडबोले येणार, 'प्रश्न अनेक उत्तर एक' पुस्तक प्रकाशन सोहळा

विशाल देशमुख

**टेंभूर्णी -** मराठवाडा शिक्षक संघटनेचे प्रांत उपाध्यक्ष, डॉक्टर फ्रिजर बॉईज हायस्कूलचे शिक्षक, लढवय्ये नेते, शिक्षकांच्या प्रश्नाची तळमळीने सोडवणूक करणारे, शिक्षकांचा प्रश्न निर्माण झाल्यास तात्काळ धावून जाणारे, ज्यांच्या नावाला अनेक उपमा देता येईल असे, ज्ञानाचा भंडार असलेले, अनेक शासन निर्णय अनेक समस्या तसेच महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती १९८१ अधिनियम १९७७, शासनाचे कोणतेही जीआर तोंडपाठ असणारे ज्ञानसूर्य ज्ञानोबा वरवट्टे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा रविवारी होत आहे. विशेष म्हणजे हा सोहळा त्यांच्या मित्रमंडळींनी ठेवलेला आहे. जालन्यात प्रथमच सगळ्यात मोठा गौरव सोहळा हा होत आहे. त्यांच्या गौरव सोहळ्यानिमित्त सेवापूर्ती निमित्त एक पुस्तक सुद्धा प्रकाशित होत आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे प्रश्न अनेक उत्तर मात्र ऐक निमित्त त्यांच्या सोहळ्याचे. आणि ढवळून निघणार शिक्षण क्षेत्र. ढवळून निघणार ज्ञान सूर्याच्या संदर्भातील अनेक प्रश्नांची उकल. शिक्षकांच्या प्रश्नावर लढणारे, शिक्षणातील समस्यांवर लढणारे आमदार सुधाकर अडबोले येणार आहेत. या सोहळ्यासाठी प्रमुख भाष्यकार म्हणून प्राध्यापक डॉक्टर प्रल्हाद लुलेकर ज्येष्ठ साहित्यिक हे विवेचन करणार असून व्याख्यान देणार आहे. त्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रामधील अनेक समस्यांची उकल होणार आहे. म्हणूनच त्या पुस्तकाचे नाव ठेवलं आहे प्रश्न अनेक उत्तर मात्र ऐक. याच संपादन केला आहे डॉक्टर पुरुषोत्तम जुने व डॉक्टर मारुती तेगंपुरे. या कार्यक्रमात सत्कारमूर्ती ज्ञानोबा वरवट्टे यांच्याबरोबरच व्यासपीठावर उपस्थिती राहणार आहे जालना जिल्ह्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लाभलेले आहे मराठवाडा शिक्षक संघटनेचे जालना जिल्हा अध्यक्ष श्री रमेश आंधळे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव. मराठवाडा शिक्षक संघटनेचे राजकुमार कदम, या कार्यक्रमास या पुस्तकाचे संपादक डॉक्टर पुरुषोत्तम जुन्रे, संपादक डॉक्टर मारुती तेगमपुरे.



ज्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा आहे ते ज्ञानोबा वरवडे म्हणजे चालता बोलता एक ज्ञानवृक्ष. समस्याग्रस्तांची समस्या सोडवणारा एक तत्त्वज्ञ. समस्या घेऊन जा आपल्या बोलीने आपल्या वाणीने ती समस्या सहज गतीने सोडून त्यापासून त्याची मुक्ती मिळवण्यास पर्यंत प्रयत्न करणारा एक लढवय्या नेता. ज्ञानोबा वरवडे यांनी शिक्षकांची समस्या सोडवण्याचा अट्टाहास धरला म्हणजे ती समस्या सुटणार. मग ती समस्या जिल्हा परिषदेच्या संपर्कातली असो. किंवा विभागीय पातळीवरची असो किंवा शासनाच्या पातळीवरची असो. तिची उकल मात्र नक्की होणार. संघटनेच्या माध्यमातून विविध कार्यालयामध्ये जेव्हा ते प्रवेश करतात तेव्हा ते प्रत्येकालाच आपलेसे वाटतात हवे हवेसे वाटतात आणि समस्या सोडवताना त्याची पुरावे कशी देता येतील याची जंत्री त्यांच्याजवळ असते. नुसतेच संघटनेचे ते कार्यकर्ते आहेत असं नाही तर आपल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांना किती फायदा होतो हे पाहणारे एक उत्तम शिक्षक. विद्यार्थ्यांचे उत्तम मार्गदर्शक म्हणूनही ते नावाजलेले आहेत. एक आपल्यातील घरातील मोठी व्यक्ती आपल्या जवळ आहे अशी ज्यांना वाटते ते म्हणजे ज्ञानोबा वरवट्टे. आशांचा गौरवपूर्ती होणं ही काळाची गरज आहे आणि त्यांना सन्मानाने त्यांचा गौरव करणे ही गरज लक्षात घेऊनच संघटनेने त्यांचा सगळ्यात मोठा गौरव ठेवला आहे. पटना इथपर्यंतच थांबली नाही तर हे निमित्त साधून डॉक्टर मारुती तेगंपुरेच्या व जुने सरांच्या सहकार्याने महाराष्ट्रातील नामवंतांचे लेख असलेले समस्यांची उकल सांगणारे एक पुस्तक या निमित्ताने प्रकाशित होत आहे. या पुस्तकांमध्ये नामवंतांचे लेख आहे ते वाचल्यानंतर लक्षात येते. अशा गौरवपूर्ती सोहळ्यासाठी सर्वांनी उपस्थित राहणं एक गरज लक्षात घेऊन आणि ज्ञानाचा भंडार आणि समस्यांची उकल व्यासपीठावरून होणार आहे ज्ञान स्तर मिळणारच आहे पण समस्याही सुटणार आहे समस्याची मार्ग दिसणार आहे म्हणून हा गौरवपूर्ती सोहळा एक दिशादर्शक ठरेल असं वाटतं.

# शेतकऱ्यांचे तात्काळ विनाशर्त पिक कर्ज मंजूर करा - प्रदीप बोराडे




**मंठा । प्रतिनिधी -** सध्याला शेतकऱ्याची अवस्था म्हणजे आई खाऊ देना आणि बाप भीक मागू दे ना या उक्प्रमाणे झाली आहे.शेतकऱ्याच्या कोणत्या शेतमालाला हमीभाव मिळ नाही.महिन्याच्या सुरुवातीस पाऊस पडल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी जवळील किडुक मिडुक खर्च करून पेरणी केली आहे.मात्र मागील जवळपास पंधरा दिवसापासून पावसाने उघडीत दिल्याने बळीराजा चिंता तूर आहे. त्या मुळे राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांना विना विलंब तात्काळ पीक कर्ज मंजूर करावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, मागील वर्षातील नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली असून राज्य शासनाच्य वतीने पीक विम्याचे धरसोडीचे धोरण सुरू आहे.पिक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर ही राज्य शासनाचे त्वरित कर मंजूर करण्याचे निर्देश असतानाही शेकडो अर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा मंठा हे प्रलंबित ठेवत असल्याने आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी वाढ होत आहे.त्या मुळे पीक कर्जा बाबत आलेले शेतकऱ्यांचे अर्ज तात्काळ निकाली काढावेत. तसेच वरिष्ठ शाखांकडे मंजुरी करिता फाईल पाठवावी लागते असे सबत देऊन टाळाटाळ केली जात आहे. तर काही ठिकाणी तांत्रिक बाबी दाखवून पीक कर्ज नाकारले जात आहे.

अशा परिस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बँकांना जाब विचारण्यासाठी बँकांची शाळा या आंदोलनात्मक कार्यक्रम राबविला जात असून शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरीत मंजुर करावे, कोणतेही तांत्रिक कारण दाखवून पिक कर नाकारु नये, अशी मागणी करत तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांचे नेतृत्वात मंठा शहरातील बँकांना करण्यात आली असून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला तर उबाठा पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात शेवटी दिला आहे. या निवेदनावर आसाराम बोराडे, देविदास खरात, प्रल्हाद कदम, संजय बोराडे राहुल बोराडे सचिन चव्हाळ गणेशराव खराबे, रवी काळे, विलास खराबे, अमोल खराबे, प्रसाद सिंह सखाराम बोराडे ,जुनेद पठाण ,ठाकुर, रितिक जाधव, गजानन झोल, ऋषिकेश वाघ, दत्ता गोरे, सचिन घेणे,इलियास शेख, तानाजी मोरे, तन्वीर शेख, विष्णुपंत वरकड, शेख ऐसान,शंकर कचरे, गणेश घोडके, प्रदीप घोडके, भागवत खराबे, विकास खराबे, सोफियान पठाण, यांनी सह्या केलेले आहेत.

# परतुर येथील मुलींना सर्वाइकल कॅन्सर लसीकरण




**परतूर । प्रतिनिधी -** परतूर लायन्स क्लब व जालना लायन्स क्लब अंतर्गत दृष्टी लॉयन्स नेत्रालय तर्फे १२० मुलीला जालना येथे लसीकरण करून आणले आहे. लायन्स क्लब जालन्याच्या पुढाकाराने या कॅन्सर लसीचा उपक्रम राबवण्यात आला होता. दृष्टी लाईन्स नेत्रालयाच्या माध्यमातून परतुर येथील सर्व शाळांना ही माहिती देण्यात आली होती. आनंद शाळेच्या अध्यक्षा सत्यशीला कदम यांनी ७५ मुली व वंडर इंग्लिश स्कूलच्या अध्यक्ष छाया सोळंके यांनी ४५ मुली या लसीकरणासाठी पालकांची संमती घेऊन नियोजन केले होते. एका मुलीला दोन हजार रुपये खर्चाची ही लस लायन्स क्लबच्या माध्यमातून मोफत देण्यात आली आहे. परतूर येथून सर्व मुलींना जालना येथे जाण्यासाठी नियोजन दृष्टी लाईन्स नेत्रालय परतूर च्या माध्यमातून करण्यात आले होते. त्या लसीसाठी नऊ वर्षे ते अठरा वर्षे वय गटातील मुलींना ही लस देण्यात आली आहे. सकाळी नऊ वाजता दोन बसच्या माध्यमातून परतुर येथून रवाना करण्यात आले होते. यासाठी मुलींच्या सोबत लायन संजीवनी खालापुरे लायन छाया सोळंके व शिक्षिका यांनी पूर्णवेळ सेवा दिली आहे. बस रवाना करते वेळेस उपस्थित लॉयन मनोहर खालापुरे लायन सुनील कासट शालिनी पिंपळे एकनाथ कदम मुलींचे पालक व इतर सर्व उपस्थित होते.

## विनोद अबोटी यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील जेईएस कॉलेज रोडवरील रहिवासी विनोद शिवपाल अबोटी यांचे रविवार दि. २२ जून रोजी पहाटे ४ वाजता निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगी, ३ भाऊ असा मोठा परिवार आहे. डॉ. रमेश अबोटी यांचे ते धाकटे बंधू होते. त्यांच्या पार्थिवावर २२ जून रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# टप्पा वाढ अनुदान निधीचा प्रश्न पावसाळी अधिवेशनात सोडवा शालेय शिक्षण मंत्र्यांना साकडे

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** राज्यातील प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार वाढीव २० टक्के अनुदान देण्यात यावे अशी मागणी जालना जिल्ह्यातील शिक्षकांनी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री रविवारी रात्री जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते यावेळी जिल्ह्यातील शिक्षकांनी त्यांची भेट घेऊन निवेदन दिले या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ च्या शासन निर्णयास आगामी पावसाळी अधिवेशनात निधीची तरतूद करून या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

यासाठी आझाद मैदान मुंबई येथे राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू असून या आंदोलनात राज्यातील बहुतांश शिक्षक सहभागी झाले आहेत शासनाने वाढीव अनुदानाचा प्रश्न निकाली काढावा अशी मागणी गेल्या वीस वर्षापासून केली जात आहे .

या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सदानंद लोखंडे, विजय सुराशे, शंकर शेरे, नागेश नागलवाड, योगेश टेके, रामेश्वर धोपटे, संदीप इंगोले, रामेश्वर कुलकर्णी, बाळू शिंदे सय्यद विकार, आरेफ खान यांच्यासह असंख्य शिक्षक बांधव यावेळी उपस्थित होते

